तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ५ नोव्हेंबर २०२५

आतील पानावर

पान २– आहाना कुमरा आजही संधीच्या शोधात
पान ३ – 'पिच टू गेट रिच'मध्ये अक्षय कुमार
पान ४ – रश्मिका मंदानाला व्हायचंय आई!
पान ५ – आवडती जोडी पुन्हा एकत्र!
पान ६ – 'बॉर्डर २' मध्ये अन्या सिंह झळकणार?



# 'लव्ह अँड वॉर'मधील आलियाचा हटके लूक

'लव्ह अँड वॉर' चित्रपटातील आलिया भट्टचा फर्स्ट लूक लीक झाला आहे. आलिया भट्टचा हा हटके लूक १९६० आणि १९७० च्या दशकाची आठवण करून देतो. अभिनेत्रीने सुंदर सिल्व्हर कलरची साडी परिधान केली आहे आणि केसांना क्लासिक लूक दिला आहे. प्रेक्षक संजय लीला भन्साळी यांच्या आगामी चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत, ज्यामध्ये आलिया भट्ट, रणबीर कपूर व विकी कौशल मुख्य भूमिकेत आहेत. आलियाच्या लूकमुळे चाहते तिच्या भूमिकेबद्दल गोंधळलेले आहेत. चित्रपटाचा पहिला लूक कधी प्रदर्शित होणार याबद्दल सोशल मीडियावर बराच काळ चर्चा सुरू होती. पण प्रेक्षकांना आलिया भट्टचा पहिला लूक अशा प्रकारे पाहायला मिळेल, असा कोणी विचारही केला असेल. चित्रपटाबद्दल बोलायचे झाले तर, हा एक लव्ह ट्रँगल चित्रपट आहे, ज्यामध्ये रणबीर कपूर आणि विकी कौशल वायुसेनेतील अधिकाऱ्याच्या भूमिकेत आहेत. संजय भन्साळी यांच्या या आगामी चित्रपटाची लोक आतुरतेने वाट पाहत आहेत. आलिया भट्टचा पहिला लूक संपूर्ण चित्रपट किती आकर्षक असेल हे दाखवण्यासाठी पुरेसा आहे. सोशल मीडियावर नेटकरी तिच्यावर कौतुकाचा वर्षाव करीत आहेत. एका व्यक्तीने खूप उत्साहित, अशी कमेंट केली. तर दुसऱ्याने लिहिले, खूप सुंदर दिसत आहेस. दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिले, ती नकारात्मक भूमिका साकारणार आहे का? सोशल मीडियावर आलिया भट्टच्या या व्हायरल फोटोंवर अशाच प्रकारच्या अनेक कमेंट्स आल्या आहेत. चित्रपटाच्या प्रदर्शन तारखेबाबत, प्रेक्षकांना अजून थोडी वाट पाहावी लागेल. वृत्तानुसार, निर्मात्यांना अजून बरेच काम करायचे आहे. संजय लीला भन्साळी हा चित्रपट २० मार्च २०२६ च्या आसपास प्रदर्शित करू शकतात. रणबीर कपूर आणि अभिनेत्री आलिया भट्ट प्रचंड चर्चेत असतात. दोघांचे एकमेकांवर किती प्रेम आहे हे अनेकदा दिसून आले आहे. दोघेही चाहत्यांना कपल्स गोल देताना दिसतात. ही जोडी सध्या त्यांच्या नव्या बंगल्यामुळेदेखील चर्चेत आहे.

# आहाना कुमरा आजही संधीच्या शोधात

अनेकदा काम न मिळाल्याने कलाकार डिप्रेशनचा सामना करतात. तीव्र स्पर्धा, फेवरेटिझम, गटबाजी यामुळे कित्येकांना संधीच मिळत नाही. अशीच एक अभिनेत्री जी बराच काळ नैराश्यात होती. आपल्या आईवडिलांच्या अपेक्षांवर खरी न उतरल्याने ती निराश झाली होती. तसंच चुकीच्या संगतीमुळे तिचं आयुष्य खराब होत होतं. ही अभिनेत्री आहे अहाना कुमरा. 'लिपस्टिक अंडर माय बुर्का' सिनेमामुळे ती प्रसिद्धीझोतात आल होती. नुकतंच एका मुलाखतीत ती म्हणाली, हे सगळं काही अचानक घडलं नव्हतं. हळूहळू या गोष्टी माझ्यासोबत होत होत्या. मी तेव्हा स्वत:ला जगापासून दूर ठेवलं होतं. खाली डोकं करुन काम करत राहा असं मी स्वत:ला समजवायचे. मला वाटतं माझं कामच माझी सर्वात मोठी शक्ती बनलं. माझ्याकडे इतरही अनेक प्लॅन होते. एखादी गोष्ट नाही मिळाली तर दुसरी मिळेल अशी मला खात्री होती. प्रत्येक गोष्टीत मी वाईट नसेल, कुठेतरी मी चांगली असेल असा मला विश्वास होता. आजही माझा प्रवास सोपा नाही. सतत प्रयत्न केल्याने मला माझ्या क्षमतांवर विश्वास बसला. मी एक चांगली अभिनेत्री आहे हे मला कायम माहित होतं. आजही संधी कमीच येतात आणि अनेकदा ज्या भूमिका ऑफर होतात त्या फारशा ताकदवान नसतात. मला ज्या दिग्दर्शकांसोबत काम करायची इच्छा आहे ती संधी अजूनही मिळालेली नाही. पण नक्कीच काहीतरी चांगलं मिळेल असा मला विश्वास आहे. आता माझा एकच मंत्र आहे. कधीही हार मानायची नाही. ना स्वत:हून, ना कामापासून आणि ना आयुष्यातून. मी आयुष्यात जे सहन केलंय त्यावरुन मी हेच शिकले की प्रयत्न कधीही सोडू नये. आता मी नवीन लोकांना भेटायला, नव्या गोष्टी करायला आणि स्वत:च्या जगातून बाहेर यायला घाबरत नाही. मला माहित आहे की माझ्या आयुष्यात काहीतरी चांगलंच होणार आहे.



# रजनीकांतच्या 'जेलर २'मध्ये मिथुनची एन्ट्री



सुपरस्टार रजनीकांतच्या 'जेलर २' चित्रपटाची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. विशेष म्हणजे अभिनेत्री विद्या बालनची यात एन्ट्री होणार आहे. या सिनेमातून विद्या तमिळ इंडस्ट्रीत पदार्पण करणार आहे. 'जेलर २' मध्ये विद्या बालन मिथुन चक्रवर्ती यांच्या मोठ्या मुली०ची भूमिका साकारणार आहे. मिथुन चक्रवर्ती या चित्रपटात मुख्य खलनायक म्हणून दिसणार आहेत. रजनीकांत आणि मिथुन चक्रवर्ती हे दोघेही या चित्रपटात एकत्र दिसणार आहेत. या चित्रपटाचे चित्रीकरण सध्या चेन्नईमध्ये सुरू आहे. जानेवारीमध्ये चित्रपटाचे पोस्ट- प्रोडक्शन सुरू होईल. चेन्नईतील चित्रीकरण पूर्ण झाल्यावर, टीम गोव्याला रवाना होईल. गोव्यात पुढील दोन महिन्यांचे चित्रीकरण केले जाईल. या कामाची तयारी सुरू झाली आहे. 'जेलर २' हा एक तमिळ ॲक्शन- कॉमेडी चित्रपट आहे. याचे दिग्दर्शन नेल्सन दिलीपकुमार यांनी केले आहे. सन पिक्चर्सचे कलानिधी मारन या चित्रपटाचे निर्माते आहेत. हा चित्रपट २०२३ मध्ये आलेल्या 'जेलर'चा सिक्वेल आहे. यात रजनीकांत पुन्हा एकदा मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. राम्या कृष्णन, योगी बाबू आणि मिर्ना हे कलाकार त्यांच्या जुन्या भूमिकांमध्ये परत येत आहेत. तर एस. जे. सूर्या एका नवीन भूमिकेत दिसणार आहेत. या चित्रपटात शिव राजकुमार, नंदमुरी बालकृष्ण आणि मिथुन चक्रवर्ती हे विशेष भूमिकेत आहेत. यातील अभिनेत्री विद्या बालनच्या एन्ट्रीने चाहत्यांकडूनही आनंद व्यक्त केला जात आहे. हा चित्रपट १२ जून २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.

# चित्रपटाशाठी त्याने खूप त्याग केलाय!

रवी दुबे हिंदी टेलिव्हिजनवरील लोकप्रिय अभिनेता आहे. आजवर त्याने अनेक मालिका, रिलिटी शोमध्ये काम केलं आहे. यासह तो एक निर्माताही आहे. लवकरच रवी दुबे नितेश तिवारी यांच्या 'रामायण' चित्रपटातून झळकणार आहे. रवी दुबे कुठल्या न कुठल्या कारणांनी सतत चर्चेत असतो. तो व त्याची पत्नी सरगुन मेहता यांची स्वत:ची निर्मिती संस्थादेखील आहे. अशातच दोघांनी नुकतीच रणवीर अल्हाबादियाला मुलाखत दिली आहे. यामध्ये रवीने 'रामायण' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान रणबीर कपूरबरोबर काम करण्याचा अनुभव सांगितला आहे. 'रामायण' चित्रपटात रणबीर कपूर श्रीरामांच्या तर रवी लक्ष्मणाच्या भूमिकेतून झळकणार आहे. रवी या मुलाखतीत आधी चित्रपटासाठी काम करण्याचा अनुभव सांगत म्हणाला, या भूमिकेमुळे माझ्यामध्ये खूप बदल झाला. भूमिकेला न्याय देण्यासाठी मला माझ्यामध्ये खूप बदल करावा लागला. माझं दिवसाचं वेळापत्रक पूर्णपणे बदललं होतं. माझ्यासह इतर सगळ्या कलाकारांनीही एवढीच मेहनत घेतली आहे. रणबीर कपूरनेसुद्धा. त्याने या चित्रपटासाठी खूप त्याग केला आहे. आम्ही सगळ्यांनी चित्रपटात साकारत असलेल्या पात्रांसाठी आमच्याकडून शक्य तितकी मेहनत घेतली आहे. रणबीर व रवी यांच्याबरोबर चित्रपटात दाक्षिणात्य अभिनेता यश रावणाची भूमिका साकारणार आहे. या दोघांबद्दल रवी पुढे म्हणाला, रणबीरचा ऑरा खूप वेगळा आहे. तो शांत, संयमी, कामाशी एकनिष्ठ असा असतो, तो खूप चांगला आहे; त्यामुळेच अनेक जण त्याला भेटल्यानंतर त्याचं कौतुक करतात. तर दुसरीकडे यश खूप वेगळा आणि सगळ्यांबरोबर मैत्रीपूर्वक संबंध ठेवणारा आहे. खूप चांगला आणि खरा माणूस आहे तो. हे दोघेही खूप वेगळे आहेत, पण दोघेही खूप चांगले आहेत. सप्टेंबर महिन्यात या वर्षी रणबीरने 'रामायण' चित्रपटासाठी स्वत:च्या काही गोष्टींमध्ये बदल करण्याचा निर्णय घेतल्याचं म्हटलं जात होतं. माध्यमांच्या वृत्तानुसार तो सात्विक आहाराचं सेवन करत होता. व्यायाम, मेडिटेशन या गोष्टींमुळे शरीराला शिस्त लावून जेणेकरून पात्र साकारताना याचा उपयोग होईल यासाठी तो या गोष्टी करत असल्याचही म्हटलं गेलं. त्याने केवळ मद्यपानच सोडलेले नाही, तर तो आता मांस, मच्छी, मटण असं काहीही खात नसून शाकाहारी झाला आहे. दरम्यान, 'रामायण' चित्रपटाचा पहिला भाग दिवाळी २०२६ मध्ये प्रदर्शित होणार आहे. त्यानंतर या चित्रपटाचा पुढचा भाग प्रदर्शित होणार असल्याचं म्हटलं जात आहे. या चित्रपटात अनेक कलाकारांची वर्णी लागली आहे, त्यामुळे प्रेक्षकही या चित्रपटाची उत्सुकतेने वाट पाहत आहेत.



# 'पिच टू गेट रिच'मध्ये अक्षय कुमार



अक्षय कुमार आता ओटीटीवर पदार्पण करणार आहे. अक्षय फॅशन बेस्ड रिॲलिटी शो 'पिच टू गेट रिच'मध्ये जज आणि इन्व्हेस्टर म्हणून दिसून येणार आहे. नव्या फॅशन स्टार्टअपला जागतिक पातळीपर्यंत पोहोचविणारा हा शो असल्याचा दावा करण्यात येत आहे. माझ्या परिवारात माझी सासू आणि पत्नी फॅशनमध्ये अत्यंत रुची बाळगणारी आहे. परंतु मी पांढरा शर्ट आणि निळ्या रंगाच्या पँटमध्ये अत्यंत आनंदी असतो, ट्रॅक पँटमध्ये मी आनंदी राहतो, पण फॅशनच्या जगतात जितके टॅलेंट आहे, तितकेच आकर्षण फॅशन बिझनेसविषयी जाणून माझ्यात निर्माण झाल्याचे अक्षय सांगतो. फॅशन इंडस्ट्रीचा वर्षातील बिझनेस ९ लाख कोटींचा आहे, तर आमची चित्रपटसृष्टी वर्षाकाठी केवळ १५ हजार कोटींचा व्यवसाय करते. याचमुळे मला या शोची कल्पना अत्यंत आवडली, ज्यात फॅशनच्या जगतातील नव्या स्टार्टअपमध्ये गुंतवणूक करत आम्ही त्यांच्या व्यवसायाला ग्लोबल स्वरुप मिळवून देऊ असे अक्षयने म्हटले आहे. पिच टू गेट रिच या शोमध्ये नव्या कंपन्यांना संधी मिळेल. मी चित्रपटसृष्टीत नेहमीच नव्या लोकांना पाठिंबा दिला आहे. मी २३ नवे दिग्दर्शक आणि २६ नवोदित अभिनेत्रींसोबत काम केले आहे. निश्चितपणे मी अधिक मेहनत करताहे, पैशांसाठी काम करतो, परंतु माझ्यासाठी संपत्तीपेक्षा अधिक महत्त्वपूर्ण मानसिक शांती असल्याचे अक्षयने म्हटले आहे. करण जौहरच्या बॅनरच्या या शोमध्ये १३ स्टार्टअप स्पर्धा करतील, ज्यात ८ पुरुष, २ महिला आणि ३ मेल- फीमेल फाउंडर आहेत. या शोची अन्य जज आणि इन्व्हेस्टर असलेली मलायका अरोराने माझा स्वत:चा एक ऑनलाइन स्टार्टअप असून तो पूर्णपणे महिलांसाठी असल्याचे सांगितले आहे.

# पवन सिंहचा संसार घटस्फोटाच्या उंबरठ्यावर



सिनेइंडस्ट्रीतील घटस्फोट हा कायमच चर्चेचा विषय राहिलेला आहे. सध्या अशाच एका प्रसिद्ध अभिनेत्याचं दुसरं लग्न घटस्फोटाच्या उंबरठ्यावर आहे. भोजपुरी सुपरस्टार अभिनेता पवन सिंह त्याच्या पर्सनल आयुष्यामुळे चर्चेत आला आहे. पवन सिंह त्याची दुसरी पत्नी ज्योतीसोबत घटस्फोट घेत आहे. पण, अभिनेत्याच्या पत्नीला मात्र त्याच्यापासून दूर जायचं नाहीये. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत पनव सिंहची दुसरी पत्नी ज्योतीने याबाबत भाष्य केलं आहे. ज्योतीने नुकतीच एकमुलाखत दिली. या मुलाखतीत तिने सांगितलं की कायदेशीररित्या पवन सिंहसोबत घटस्फोट झाला असता तर त्याची अर्धी संपत्ती मला मिळाली असती. पण, मला पैसे नको आहेत. मला त्यांची संपत्ती किंवा पैशांशी काहीच घेणंदेणं नाही. मला फक्त माझा नवरा परत हवाय. जोपर्यंत न्यायालयात ही गोष्ट जात नाही तोपर्यंत मीच त्यांची पत्नी आहे. पण त्यांची टीम मला त्यांना भेटू देत नाही. मला फक्त एकदा माझ्या नवऱ्याला भेटून त्याच्याशी बोलायचं आहे. ज्योतीने काही दिवसांपूर्वीच इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली होती. यामध्ये ती म्हणाली होती की पवन सिंह तिला भेटत नाही किंवा बोलतही नाही. त्यामुळे आत्महत्या करण्याशिवाय दुसरा कोणताच पर्याय नसल्याचं ज्योतीने सांगितलं होतं. दरम्यान, ज्योती ही अभिनेता पवन सिंहची दुसरी पत्नी आहे. पवनने २०१४ मध्ये नीलम सिंहसोबत पहिलं लग्न केलं होतं. मात्र, लग्नानंतर तीन महिन्यांतच नीलमचा मृत्यू झाला. त्यानंतर २०१८मध्ये पवन सिंहने ज्योतीसोबत दुसरं लग्न केलं. पण, काही काळानंतर नात्यात बिनसलं. सध्या पवन सिंह 'राइज अँड फॉल' या रिएलिटी शोमध्ये सहभागी झाला आहे.

# मलायका करणार पुन्हा लग्न?




बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री मलायका अरोरा सतत कोणात्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असते. थामा या सिनेमातील एका गाण्यामुळे ती पुन्हा एकदा चर्चेत आली. नुकताच मलायकाने तिचा ५२ वा वाढदिवस साजरा केला आहे. पण अजूनही तिचे चेहऱ्यावरचे तेज खुलून असून, ती या वयातही खूप सुंदर दिसते. तिने पहिला पती अरबाज खानसोबत घटस्फोट घेतल्यानंतर अभिनेता अर्जुन कपूर याच्यासोबत रेलशनशिपमध्ये असल्याचे समोर आले होते. पण दोघांनीही एकमेकांपासून दूर राहिणे पसंत केले आहे. आता नुकत्याच एका मुलाखतीत मलायकाने तिच्या भूतकाळातील आठवणींना वाट मोकळी केली. या आठवणी सांगताना ती भावूक झाली होती.

अभिनेत्रीने या मुलाखतीत तिच्या पहिल्या लग्नाबद्दलचा खुलासा करत ज्यावेळी तिचे लग्न झाले त्यावेळी ती खूप लहान होती, असे सांगितले. तसेच तिने लग्न करताना तरुणांना विचार करून निर्णय घेण्याचा लाख मोलाचा सल्लाही दिला. अभिनेत्री मलायका अरोराने नुकतेच एका मुलाखतीत दिली. या मुलाखतीदरम्यान, तिला १६ वर्षांपूर्वीचा एक क्षण आठवण्यास सांगण्यात आले होते आणि इतरांना ती काय सल्ला देईल? असा प्रश्न तिला करण्यात आला. यावर अभिनेत्री म्हणाली, लग्नापूर्वी तरुणांनी त्यांचा वेळ काढला पाहिजे. मुली इतक्या लवकर लग्न का करू इच्छितात हे मला माहित नाही; त्याची काही गरज नाही. आयुष्याला थोडे समजून घ्या, आधी काही काम करा, असा सल्ला तिने दिला. पुनर्विवाह आणि पुन्हा नात्यात येण्याबद्दल तिला विचारले असता, मी काहीही सांगू शकत नाही कारण ी प्रेमावर विश्वास ठेवते. असे उत्तर तिने दिले.



# रश्मिका मंदानाला व्हायचंय आई!

रश्मिका मंदाना सध्या हिंदी आणि दाक्षिणात्य सिनेसृष्टीत आघाडीवर आहे. बऱ्याच सिनेमांमध्ये रश्मिकाला मुख्य अभिनेत्री म्हणून पसंती मिळते. त्यामुळे तिचा भाव चांगलाच वधारला आहे. नुकताच तिचा 'थामा' रिलीज झाला असून बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत आहे. रश्मिका फक्त प्रोफेशनलच नाही तर वैयक्तिक आयुष्यामुळेही चर्चेत आहे. विजय देवरकोंडासोबत साखरपुडा झाल्याची बातमी तिने जवळपास कन्फर्मच केली आहे. तर आता तिने आई होण्यावरही प्रतिक्रिया दिली आहे. रश्मिका मंदानाचा 'द गर्लफ्रेंड' सिनेमा रिलीज होणार आहे. सिनेमाच्या प्रमोशननिमित्ताने तिने नुकतीच मुलाखत दिली. तेव्हा भविष्यात होणाऱ्या मूलाबाळाच्या निर्णयावर ती म्हणाली, मी अजून आई झालेही नाही तरी मला आतापासूनच असं वाटत आहे. मला मूलं होतील या विचारानेच मी खूश होते. ते अजून जन्मालाही आलेले नाहीत पण मला आतापासूनच खूप प्रेम, जिव्हाळा वाटतो. मला त्यांच्यासाठी सगळं काही करायचं आहे. मसला त्यांना सुरक्षित ठेवायचं आहे. त्यांच्यासाठी मला युद्धही करावं लागलं तर मी करेन. त्यासाठी मला इतकं फिट व्हायचं आहे की मी युद्धही लढू शकेन. मी आतापासूनच या सगळ्याबद्दल विचार करत आहे. आयुष्यातील प्रत्येक टप्प्यासाठी ठराविक वयाची अट मी स्वत:लाच घातली आहे. ती पुढे म्हणाली, वयाच्या २० ते ३० वर्षात मान खाली घालून फक्त काम करायचं हे माझ्या डोक्यात कायम होतं. समाजानेच आपल्या डोक्यात हे विचार घातलेले असतात. आपल्याला कमवायचं असतं. नंतर ३० ते ४० या वयात आपल्याला काम आणि वैयक्तिक आयुष्य दोन्हीत संतुलन साधायचं असतं. माझ्याही आयुष्यात हे असंच व्हावं असा माझा प्रयत्न आहे. चाळीशीनंतर काय करायचं एवढा अजून मी विचार केला नाही. रश्मिका मंदाना अनेक वर्षांपासून विजय देवरकोंडाला डेट करत आहे. दोघांची जोडी 'गीता गोविंदम' आणि 'डिअर कॉम्रेड'मध्ये एकत्र दिसली होती. तिथूनच त्यांच्या केमिस्ट्रीला सुरुवात झाली. लवकरच दोघं लग्नगाठ बांधणार आहेत. ते कधी लग्न करणार यासाठी चाहतेही उत्सुक आहेत.



# जी. डी. नायडूंवर येतोय बायोपिक

भारताचे एडिसन अशी ओळख असणारे प्रसिद्ध संशोधक आणि उद्योजक जी. डी. नायडू यांच्या जीवनावर आधारित एक सिनेमा येणार आहे. या आगामी सिनेमाच्या घोषणेचा टीझर समोर आला आहे. विशेष म्हणजे भारतीय सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेता या सिनेमात नायडूंची भूमिका साकारणार आहे. या अभिनेत्याचं जबरदस्त ट्रान्सफॉर्मेशन बघून प्रेक्षक थक्क झाले आहेत. कोण आहे हा अभिनेता? दमदार अभिनयासाठी ओळखण्यात आलेला अभिनेता आर. माधवन या सिनेमात प्रमुख भूमिका साकारणार आहेय. या भूमिकेनुसार माधवनने केलेलं अविश्वसनीय ट्रान्सफॉर्मेशन बघून त्याचे चाहते थक्क झाले आहेत. 'रॉकेट्री: द नंबी इफेक्ट' या सिनेमानंतर माधवन आता पुन्हा एकदा 'जीडीएन' या बायोपिकमध्ये एका वेगळ्याच रूपात दिसणार आहे. 'भारताचे एडिसन' म्हणून जी. डी. नायडूंना ओळख मिळाली. नायडूंच्या व्यक्तिमत्वातील अज्ञात पैलू या सिनेमातून उलगडण्यात येणार आहेत. या आगामी सिनेमाचा फर्स्ट लुक टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. या टीझरमध्ये माधवनचा ट्रान्सफॉर्मेशन इतका प्रभावी आहे की, हाच माधवन आहे, हे ओळखणंही कठीण आहे.

आर. माधवनने आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर हा टीझर शेअर करताना लिहिलं, जी. डी. नायडू यांची ऊर्जा आता सर्वांसमोर आली आहे. ही कथा आहे एका अद्वितीय दृष्टिकोन, महत्त्वाकांक्षा आणि जिद्दीची. 'जीडीएन'चा फर्स्ट लुक टीझर सादर करताना आम्हाला अभिमान वाटतो. माधवनचा हा नवीन लुक पाहून चाहते थक्क झाले आहेत. हा चित्रपट पुढील वर्षी २०२६ ला प्रदर्शित होणार आहे.

# ऋषभ शेट्टीने केले मोठं प्लॅनिंग

ऋषभ शेट्टी हा उत्कृष्ट अभिनेत्यांपैकी एक आहे. ऋषभ शेट्टीचा अभिनय थेट प्रेक्षकांच्या हृदयाला जाऊन भिडतो. सध्या त्याच्या 'कांतारा चॅप्टर १' चित्रपटानं जगभरात धुमाकूळ घातला. या चित्रपटाच्या कथेपासून ते त्यातील गाण्यापर्यंत सर्वकाही लोकांच्या पसंतीस उरत आहे. अभिनयासोबत ऋषभ शेट्टीनेच या चित्रपटाचं दिग्दर्शन आणि लेखन केलं आहे. 'कांतारा' आणि 'कांतारा चॅप्टर १'च्या यशामुळे ऋषभ आता पॅन-इंडिया स्टार बनला आहे.

'कांतारा चॅप्टर १'नंतर ऋषभच्या पुढच्या चित्रपटाची चाहते आतुरतेने वाट पाहात आहेत. ऋषभ शेट्टी आता एकापाठोपाठ एक मोठे चित्रपट घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'कांतारा' आणि 'कांतारा चॅप्टर १'च्या यशानंतर त्याचे आगामी ३ मोठे सिनेमे येत आहेत. ऋषभ शेट्टीचा पुढील बहुप्रतिक्षित बिग बजेट चित्रपट 'छत्रपती शिवाजी महाराज' हा असणार आहे. या चित्रपटाची घोषणा झाल्यापासून चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. या चित्रपटाची पटकथा जवळजवळ पूर्ण झाली असून त्याचे शूटिंग २०२६ मध्ये सुरू होणार आहे. फिल्मीबीटमधील वृत्तानुसार, ऋषभ शेट्टी स्टारर हा चित्रपट २०२७ मध्ये थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. या यादीतील दुसरा चित्रपट आहे जय हनुमान'. ऋषभ शेट्टी हनुमानाच्या अवतारात प्रेक्षकांसमोर येणार आहे. हा मेगा-बजेट चित्रपट प्रशांत वर्मा दिग्दर्शित करणार आहेत. या चित्रपटाचं शूटिंग या वर्षी डिसेंबरपासून सुरू होणार आहे. या चित्रपटाचा पहिला लूक आणि पोस्टर काही दिवसांपूर्वीच समोर आलंय. या चित्रपटाची घोषणा ऑक्टोबर २०२४ मध्ये करण्यात आली होती आणि याला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. दिग्दर्शक जयतीर्थ यांच्या बेल बॉटम सीक्वल या कन्नड चित्रपटाने साऊथ इंडियन फिल्म इंडस्ट्रीत इतिहास घडवला होता. आता ऋषभ शेट्टी या चित्रपटाच्या सिक्वेलद्वारे पुन्हा एकदा थिएटरमध्ये धमाका करण्याच्या तयारीत आहेत. याशिवाय ऋषभ शेट्टी दिग्दर्शक म्हणून 'रुद्रप्रयाग' या चित्रपटावर काम करत आहेत. तसेच त्यांचा पुढचा प्रोजेक्ट 'नाथूराम' येणार आहे.



# माझ्या चित्रपटाचा ट्रेलर पाहू नका!



'आई' 'कांतारा', 'दशावतार' या चित्रपटांनंतर आता प्रेक्षकांच्या भेटीला मातीतली गोष्ट सांगणारा अजून एक नवीन चित्रपट लवकरच येणार आहे. टीझर प्रदर्शित झाल्यापासून या चित्रपटाबद्दल अनेकांमध्ये उत्सुकता असल्याचं दिसतं. हा चित्रपट म्हणजेच 'गोंधळ'. परंतु, असं सगळं असताना चित्रपटाच्या दिग्दर्शकानं मात्र प्रेक्षकांना वेगळच आवाहन केलं आहे.

'गोंधळ' या चित्रपटाचं दिग्दर्शन संतोष डावखर यांनी केलं असून, हा चित्रपट येत्या १४ नोव्हेंबरला चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे आणि आता २९ ऑक्टोबरला चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित होणार आहे. 'कांतारा चॅप्टर १'बरोबर या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला आणि तेव्हापासून या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली. परंतु, आता चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित होण्याआधी दिग्दर्शक संतोष डावखर यांनी याबद्दल प्रतिक्रिया देत आवाहन केलं आहे. एका मुलाखतीत त्यांनी याबद्दल सांगितलं आहे. गोंधळ या चित्रपटाच्या ट्रेलरबद्दल संतोष डावखर म्हणाले, २९ ऑक्टोबरला संध्याकाळी ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. मी सर्व सिनेरसिकांना आग्रहाची विनंती करेन की, जर तुम्ही तुम्हाला हे आवर्जून सांगेन की, जर तुम्ही चित्रपट बघायचा की नाही याबद्दल अजून काही ठरवलं नसेल, तर तुम्ही ट्रेलर पाहा. पण, जर तुम्ही चित्रपट बघायचाच आहे, असं ठरवलं असेल, तर हा ट्रेलर पाहू नका, असं आवाहन मी करेन. गोंधळ या चित्रपटात अनेक लोकप्रिय कलाकार पाहायला मिळणार आहे. या चित्रपटाला पद्मविभूषण इल्लैयाराजा यांनी संगीत दिलं आहे. महत्त्वाचं म्हणजे या चित्रपटाच्या संगीतासाठी त्यांनी खास नाशिक येथे जाऊन गोंधळ आणि ही संस्कृती नेमकी काय आहे याचा दोन दिवस अभ्यास केल्याचं संतोष डावखर यांनी या मुलाखतीत सांगितलं आहे.

चित्रपटगृहांत जाऊन हा चित्रपट बघायचं ठरवलं असेल, तर कृपया याचा ट्रेलर पाहू नका. कारण - याच्या स्क्रीनप्लेमध्ये एकेका पात्राची गूढता, वेगळेपण हे सगळं खूप रंजक आहे. ते पात्र जसजसं तुम्हाला कळत जाणार तसतसं चित्रपटाची कथा पुढे सरकते. त्यामुळे जर तुम्ही ट्रेलर पाहिला, तर चित्रपटगृहांत चित्रपट पाहण्याची जी मजा आहे, ती कुठेतरी एक टक्क्याने कमी होऊ शकते. दिग्दर्शक संतोष डावखर पुढे म्हणाले, त्यामुळे मी

# आवडती जोडी पुन्हा एकत्र!



२०१० मध्ये अभिनेता स्वप्निल जोशी आणि अभिनेत्री मुक्ता बर्वे 'मुंबई- पुणे- मुंबई' या सिनेमात एकत्र दिसले. या सिनेमावर प्रेक्षकांनी भरभरून प्रेम केले. या सिनेमातील स्वप्निल- मुक्ताची जोडीने प्रेक्षकांची मनं जिंकली. यानंतर मुंबई- पुणे- मुंबई २ प्रदर्शित झाला. याही सिनेमाला प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला. याशिवाय काही वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या 'मुंबई पुणे मुंबई ३'ला सुद्धा प्रेक्षकांना चांगला प्रतिसाद दिला.

आता या सिनेमाचा पुढचा भाग मुंबई पुणे मुंबई ४ ची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. मराठी सिनेसृष्टीत आपल्या वेगळ्या आशयाच्या सिनेमांसाठी दिग्दर्शक सतीश राजवाडे ओळखले जातात. नुकताच त्यांनी दिग्दर्शित केलेल्या प्रेमाची गोष्ट २ हा सिनेमा प्रदर्शित झाला. या सिनेमासोबत त्यांनी मुंबई पुणे मुंबई ४ ची घोषणा करणारा एक व्हिडीओ शेअर केला आहे. १५ वर्षांपूर्वी सुरु झाला एक रोमँटिक प्रवास', 'नात्यांची गोडवा वाढवायला पुन्हा येतोय' अशी सुंदर टॅगलाईन सतीश राजवाडे यांनी मुंबई पुणे मुंबई ४ सिनेमाची घोषणा करताना दिली आहे.

यामुळे पुन्हा एकदा स्वप्निल जोशी आणि मुक्ता बर्वे यांची जोडी मोठ्या पडद्यावर एकत्र पाहायला मिळणार आहे. मात्र, हा सिनेमा रिलीज कधी होणार याबाबत माहिती समोर आलेली नाही. चौथ्या भागात गौरी-गौतमच्या आयुष्याच्या कोणत्या पैलूवर भाष्य केले जाणार हे पाहणे उत्सुकतेचे असणार आहे. तुकाराम' हा चित्रपट ७ नोव्हेंबरला आपल्या भेटीला येणार आहे.

# पुष्करच्या आगामी सिनेमात कलाकारांची मांदियाळी



२०१० मध्ये अभिनेता स्वप्निल जोशी आणि अभिनेत्री मुक्ता बर्वे 'मुंबई- पुणे- मुंबई' या सिनेमात एकत्रपुष्कर जोगच्या आगामी हिंदी चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. त्याचबरोबर या चित्रपटातील कलाकारांचे लूक पोस्टरही रिलीज करण्यात आले आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीखदेखील निर्मात्यांनी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे पुष्कर जोगच्या चित्रपटाचं नाव फारच वेगळं आहे. भारतीय चित्रपटसृष्टीत क्वचितच पाहिलेलं, वास्तव आणि कल्पनेच्या सीमारेषा मिटवणारं जग आता पडद्यावर येणार आहे.

'ह्युमन कोकेन' हा एक सायकोलॉजिकल थ्रिलर चित्रपट लवकरच रिलीज होणार आहे. हा सिनेमा प्रेक्षकांना मानवी तस्करी, सायबर सिंडिकेट आणि ड्रग कार्टेलच्या जगात घेऊन जाणार आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने पुष्कर जोग पुन्हा एकदा एका प्रभावी आणि आव्हानात्मक भूमिकेत झळकणार आहे. 'जबरदस्त' या मराठी चित्रपटातून सिनेसृष्टीत पदार्पण करणारा आणि 'बिग बॉस' मराठीच्या पहिल्या सिझनमधील लोकप्रिय रनर-अप म्हणून ओळख मिळवल्यानंतर, तसेच 'व्हिक्टोरिया- एक रहस्य'च्या यशानंतर, पुष्कर आता पूर्णपणे वेगळ्या आणि संवेदनशील विषयावर आधारित सिनेमात झळकणार आहे. या चित्रपटाबद्दल पुष्कर म्हणाला, 'ह्युमन कोकेन' हा माझ्या आयुष्यातील सर्वात कठीण आणि भावनिकदृष्ट्या आव्हानात्मक चित्रपट आहे. या पात्रात शिरण्यासाठी मी मानसिक आणि शारीरिक तयारीसोबत बर्याच कार्यशाळा केल्या. एका गुन्हेगारी जाळ्यात अडकलेल्या व्यक्तीचा अंतर्गत संघर्ष समजून घेणं अजिबात सोपं नव्हतं.

चित्रपटात इशिता राज, सिद्धांत कपूर, जाकीर हुसेन आणि काही ब्रिटिश कलाकारांची तगडी स्टारकास्ट असून चित्रपटाला एक आंतरराष्ट्रीय लुक प्राप्त झाला आहे. ची तेंग जू आणि हरीत देसाई 'ह्युमन कोकेन' चे निर्माते असून छायाचित्रण सोपन पुरंदरे, संपादन संदीप फ्रान्सिस, संगीत क्षितिज तारे, तर नृत्यदिग्दर्शन पवन शेट्टी आणि खालिद शेख यांनी केले आहे. युनायटेड किंगडममध्ये चित्रीत झालेला 'ह्युमन कोकेन' हा केवळ एक सिनेमा नाही, तर आपल्याला सामोरे येण्यास भीती वाटणार्या वास्तवाचं निःसंकोच प्रतिबिंब आहे. 'ह्युमन कोकेन' येत्या नवीन वर्षात म्हणजेच १६ जानेवारी २०२६ रोजी सर्व चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# 'बॉर्डर २' मध्ये अन्या सिंह झळकणार?




अभिनेता १९९७ च्या कल्ट क्लासिक ठरलेल्या 'बॉर्डर' सिनेमाचा सीक्वल लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. बॉर्डर २ हा सिनेमा आधीच चर्चेत आहे आणि आता या बहुप्रतिक्षित सिनेमाविषयी एक नवीन अपडेट समोर आली आहे. सनी देओल अभिनीत या आगामी सिनेमात वरुण धवन, अहान शेट्टी आणि दिलजीत दोसांझ हे कलाकार काम करणार आहेत हे अगोदरच स्पष्ट करण्यात आले होते. आता या सिनेमात आणखी एका कलाकाराची एन्ट्री होणार असल्याची माहिती समोर आली आहे. वृत्तानुसार, अभिनेत्री अन्या सिंह या सिनेमाचा भाग होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. अन्या या सिनेमात अहान शेट्टीसोबत झळकेल अशी माहिती आहे. अद्याप याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. अभिनेत्री अन्या सिंगने २०१७ मध्ये 'कैदी बँड' या सिनेमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. त्यानंतर तिने अनेक सिनेमे आणि वेबसिरीजमध्ये काम केले आहे. नुकत्याच आर्यन खान दिग्दर्शित 'द बॅड्स ऑफ बॉलीवूड' या वेबसिरीजमध्ये तिच्या अभिनयाचे कौतुक करण्यात आले. जर अन्याला बॉर्डर २ मध्ये कास्ट केले गेले तर तो तिच्या कारकिर्दीतील आतापर्यंतचा सर्वात मोठा प्रोजेक्ट असणार आहे. बॉर्डर २ हा सिनेमा अनुराग सिंग दिग्दर्शित करत आहेत. या सिनेमात सनी देओल वरुण धवनसोबत त्याच्या प्रतिष्ठित भूमिकेत परतणार आहे. हा सिनेमा २२ जानेवारी २०२६ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. या सिनेमाचे चित्रीकरण जवळपास पूर्ण झाले असून, काही सीन्स चित्रित करण्याचे बाकी आहेत.

# मृणाल आणि आदिवी दिसणार डकैत सिनेमात

आदिवी सेश आणि मृणाल ठाकूर अभिनीत डकैत चित्रपटाची नवीन प्रदर्शन तारीख निश्चित करण्यात आली आहे. हा चित्रपट मूळतः डिसेंबर २०२५ मध्ये प्रदर्शित होणार होता, परंतु सेशच्या दुखापतीमुळे, नवीन प्रदर्शन तारीख जाहीर करण्यात आली आहे. मृणालने तिच्या आगामी डकैत चित्रपटाचे इंस्टाग्रामवर एक नवीन पोस्टर शेअर केले आणि चित्रपटाची नवीन प्रदर्शन तारीख जाहीर केली, कॅप्शनमध्ये लिहिले, ऊ-उजखढ सोबत धमाकेदार नाटकाचा अनुभव घ्या. १९ मार्च २०२६ रोजी हिंदी आणि तेलुगूमध्ये एक भव्य जागतिक प्रदर्शन. टीमने आज इंस्टाग्रामवर डकैत च्या नवीन प्रदर्शन तारखेची अधिकृत घोषणा केली. डकैत १९ मार्च २०२६ रोजी उगादी आणि ईदच्या निमित्ताने थिएटरमध्ये प्रदर्शित होईल. आलिया भट्ट, रणबीर कपूर आणि विकी कौशल अभिनीत संजय लीला भन्साळी यांच्या रोमँटिक नाटक लव्ह अँड वॉर प्रमाणेच हा चित्रपट प्रदर्शित होईल असे वृत्त आहे. लव्ह अँड वॉर २० मार्च २०२६ रोजी प्रदर्शित होत आहे.



# फर्जी २ साठी शाहीदने घेतले सर्वाधिक मानधन



बॉलिवूडचा चॉकलेट बॉय शाहिद कपूर सध्या कॉकटेल २ च्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. दरम्यान, त्याच्या बहुप्रतिक्षित मालिकेबद्दल एक अपडेट समोर आली आहे, फर्जी २. या मालिकेचे शूटिंग आणि रिलीज वेळापत्रक उघड झाले आहे आणि शाहिद कपूरच्या फर्जी २ च्या मानधनाबद्दलचे गुढही उघड झाले आहे. अहवालानुसार, शाहिद कपूर नवीन वर्षात फर्जी २ चे शूटिंग सुरू करणार आहे. या मालिकेसाठी अभिनेत्याने मोठी रक्कम आकारली आहे. असे म्हटले जाते की शाहिद कपूरने फर्जी २ साठी त्याच्या कारकिर्दीतील सर्वाधिक मानधन घेतले आहे. अहवालात म्हटले आहे की, फर्जी सध्या लेखनाच्या टप्प्यात आहे आणि अमेझॉन प्राइम, राज आणि डीके यांच्या सहकार्याने, जानेवारी २०२६ मध्ये दुसऱ्या सीझनचे चित्रीकरण सुरू करण्यास उत्सुक आहे. शाहिदने शूटिंगसाठी सहा महिने समर्पित केले आहेत आणि त्याला भरघोस मानधन मिळत आहे. शाहिद 'फर्जी २' साठी ४० कोटी रुपये घेत आहे. हे त्याच्या अभिनय कारकिर्दीतील सर्वाधिक मानधन आहे आणि पहिल्या भागाला मिळालेल्या कौतुकाचे हे फळ आहे. 'फर्जी २' च्या प्रदर्शन तारखेबाबत, ही मालिका २०२६ च्या अखेरीस किंवा २०२७ च्या सुरुवातीला प्रदर्शित होण्याची अपेक्षा आहे. दुसरा सीझन पहिल्यापेक्षाही मोठा असेल आणि प्रेक्षक ओटीटी प्लॅटफॉर्म प्राइम व्हिडिओवर त्याचा आनंद घेऊ शकतील. कामाच्या बाबतीत, शाहिद कपूर शेवटचा 'देवा' चित्रपटात दिसला होता. आता, अभिनेत्याकडे विशाल भारद्वाजचा 'ओ रोमियो' हा चित्रपट आहे. या चित्रपटात तो तृप्ती दिमरीसोबत रोमान्स करताना दिसणार आहे. 'ओ रोमियो' १४ फेब्रुवारी २०२६ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. शाहिद कपूरकडे रश्मिका मंदान्ना आणि कृती सेनन अभिनीत कॉकटेल २ देखील आहे. हा चित्रपट २०२६ मध्ये प्रदर्शित होण्याची अपेक्षा आहे.

# हमिंग स्वरांचा बादशहाः हेमंतकुमार



'छुपा लो यूं दिल में प्यार मेरा, कि जैसे मंदिरमे लौ दिये की...' हमिंग स्वरांच्या मैफिलीत आसमंत गलबलून टाकणारे हेमंतकुमार व कुठल्याही गायकाच्या वैशिष्ट्याशी मेळ बसवून स्वर साधना करणारी गानकोकिळा लता मंगेशकर या जोडीने हे युगल गीत 'ममता' या १९६६ सालच्या चित्रपटात गाऊन दर्शकांवर मोहिनीच टाकली. 'छुपालो'चे स्वर आसमंतात घुमताच सुरक्षेचे आर्जव व्यतीत होते. 'जैसे मंदिर मे'नंतरचा पॉज, नंतर 'लो दियेकी' या स्वरातून पावित्र्य प्रसवते.

लता 'तुम अपने चरणो में रख लो मुझको, तुम्हारे चरणोकी धूल हूँ मै...' लता यांच्या प्रतिसादातून नम्र समर्पण भाव व्यतीत होताना गाण्यातील शब्दांना स्वराद्वारे जिवंत करणारे हे गीत दर्शकांना वेगळ्याच दुनियेत घेऊन जाते. संगीतकार रोशन यांनी पहिल्यांदाच हेमंतदा यांना गायला दिले. स्वतः रोशन व हेमंतदा दोघेही उच्चकलाकार ठरले.

'आऽऽ गुपचुप गुपचुप प्यार करे', 'छुप छुप आँखे चार करे' हेमंत कुमार यांनी हे गीत १९५१ च्या 'सजा' चित्रपटात संध्या मुखर्जीसोबत गायले आहे. सचिनदा या पारखी संगीतकाराने हेमंतकुमारच्या स्वरांची अनोखी जादू ओळखली. देवानंद व निम्मी यांच्यावर चित्रित या गाण्याची सुरुवात संध्या करतात व हेमंतदा अनोख्या अंदाजात 'छुप छुप आँखे चार करे' गातात. ध्रुपदांनतर सचिनदाने खालील अनोखे बोल सिनेमातील प्रसंगानुसार अतिशय वेगळ्या धाटणीत गुंफले आहे. १९५२सालच्या 'जाल' चित्रपटात. हेमंतदांचा हुंकार आकाशस्थ वैश्विक शक्तींनाही खूश करू शकेल. हेमंतदांच्या सुरांच्या जादुणे दिवंगत प्रेयसीही आपल्या कबरीतून उठून बाहेर येऊन वाट पाहणार्या प्रियकराला आपले प्रेम अर्पण करेल. ही कल्पना असली, तरीही हेमंतदांच्या स्वरात अशी किमया होती. जसे मेघ मल्हार आळवला तर पाऊस पडतो, दीपराग आळवला तर दिवे लागतात तसे.

'वंदेऽऽ मातरम्! वंदेऽऽ मातरम्' अगदी हिंदी चित्रपटात संगीतकार म्हणून पदार्पणातच 'आनंदमठ' या १९५२ सालच्या चित्रपटात हेमंतदांनी आपल्या विशाल मर्यादा स्पष्ट केल्या. देशभक्तिपर वंदेमातरम् हे गीत अतिशय गोड व अभिनव दृत चालीत लता व स्वतःच्या साथीत कोरसमध्ये स्वतःच्या संगीतात चपखल बसवून अजरामर केले. हे गाणे ऐकल्यावर देहाचा कान होतो इतके ते मधुर व श्रवणीय आहे.

'जागे दर्द इश्क जाग...' १९५३ सालच्या 'अनारकली' चित्रपटातील सी. रामचंद्र यांची कल्याणी रागातील ही रागिणी हेमंतदांनी गाऊन तानसेनी गायकी सिद्ध केली. 'न ये चांद होगा, न तारे रहेंगे, मगर हम हमेशा तुम्हारे रहेंगे'. १९५४ सालच्या 'शर्त' चित्रपटातील या गाण्यात सुरुवात मंद हळुवार स्वरात करून नंतर थोड्या दृतात चाल बांधण्याचा प्रयोग सलगपणे करून जणू स्वरांच्या चांदण्यात भिजल्याचा आनंद दिला. असे असले, तरी संगीतकार म्हणून त्यांची कारकीर्द सिद्ध झाली ती १९५४ सालच्या 'नागीण' चित्रपटाच्या संगीताने. नावाजलेल्या पहेलवानांच्या कुस्ती स्पर्धेत एखाद्या नवोदित पहेलवानाने बाजी मारावी तद्वतच हेमंतदांबद्दल झाले. 'तन डोले मेरा मन डोले' या गीताला त्या वर्षीच्या सर्वोत्कृष्ट गीताचा मान व तत्कालीन दिग्गज संगीतकारांच्या स्पर्धेत हेमंतदा यांना त्या वर्षीचा उत्कृष्ट संगीतकाराचा फिल्म फेअर पुरस्कार मिळाला.

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर हे जगातील सर्वोत्कृष्ट संगीतकार आहेत, असा दृढ विश्वास बाळगणारे संगीतकार म्हणजे हेमंतकुमार होते. रवींद्र संगीताच्या नंदनवनातून सिने संगीताला आवश्यक तेवढीच निवडक सुगंधी पुष्पाची परडी चित्रपटसृष्टीत रिती केली. रवींद्र संगीताचे पाईक म्हणून सुरुवात केली व अखेरपर्यंत रवींद्र संगीताचाच पदर पकडून ख्यातनाम झाले.

'जाने वो कैसे लोग थे जिनको प्यार से प्यार मिला' 'प्यासा'मधील हेमंतदाने गायलेल्या या गाण्याने मोहरून गेलेल्या गुरुदत्त ने 'साहिब बीबी और गुलाम' चित्रपटाच्या संगीताची धुरा हेमंतदाच्या खांद्यावर दिली. १९६२ साली हेमंतदा यांनी स्वतः ची गीतांजली फिल्म संस्था काढली. पहिला चित्रपट 'बीस साल बाद' काढला. 'कही दीप जले कही दिल' शिवरंजनी रागातील हेमंतदांची बुलंद धुंद लता यांनी मधुर स्वरात गाऊन अमर केली. 'तुम पुकार लो तुम्हारा इंतजार है, ख्वाब बुन रही है रात बेकरार है, तुम्हारा इंतजार है...' गीतांजली फिल्म्सची बहुमोल देण!


१६ जून १९२० रोजी हेमंत कालिदास मुखोपाध्याय यांचा जन्म बनारस येथे झाला. शास्त्रीय गायनाचे रीतसर शिक्षण घेऊन आपल्या भारदस्त व बुलंद आवाजात बालपणापासूनच कित्येक संधीचे सोने केले. १९४० साली 'निमाई सन्यास' या बंगाली चित्रपटात प्रथम गायले. 'भला था कितना अपना बचपन' या हिंदी गाण्याने बंगालच्या बाहेरही प्रसिद्धी मिळाली. १९४५ साली प्रसिद्ध बंगाली गायिका बेला मुखर्जीसोबत विवाह झाला. दोन बंगाली चित्रपटांना संगीत दिले. मुंबईहून बोलावणे आले. मुंबईत दोन चित्रपटात गाणी म्हटलीत. त्यानंतर ५-६ वर्षांनी सचिन देव बर्मन यांनी १९५१ साली 'सजा' व १९५२ साली 'जाल'मध्ये गाण्याची संधी दिली. १९५२ साली फिल्मीस्थानचे शशिधर मुखर्जी यांनी 'आनंदमठ'चे संगीत दिले. नंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही.

हेमंतदा यांना अनेक पुरस्कार मिळाले. त्यामध्ये सर्वोत्कृष्ट पुरुष पार्श्वगायक दोन वेळा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार. सर्वोत्कृष्ट चित्रपट निर्माता पुरस्कार १९७० साली 'निमंत्रण' या चित्रपटासाठी. फिल्म फेअर पुरस्कार एक वेळा सर्वोत्कृष्ट संगीतकार म्हणून 'नागीण' चित्रपटासाठी १९५५ साली.

हेमंतदांनी भारत सरकारने दिलेले १९७० साली पद्मश्री व १९८७ साली पद्मभूषण हे दोन्ही पुरस्कार नाकारले. हेमंतदांनी ५४ हिंदी चित्रपटात ३९२ गाणी गायलीत. हिंदी व बंगाली मिळून सुमारे २००० गाणी गायलीत. चांदण्या रात्री प्रीतीचा अनुनय देणारे व आपल्या बुलंद स्वराने आसमंत गलबलून टाकणारे गायक, संगीतकार व चित्रपट निर्माते हेमंत कुमार यांची बंगाली मिठास २६ सप्टेंबर १९८९ रोजी कलकत्ता येथे संपली. अजूनही आकाशाकडे दृष्टीगेल्यास त्यांचा स्वर कर्णी गुंजतो.'तुमऽऽ पुकार लो। तुम्हारा इंतजार है... हुं हुं हुं...।।'

**रमेश पोफळी**

# रंगीला होणार ३० वर्षांनी पुन्हा रिलीज




मागच्या काही वर्षांपासून जुने चित्रपट पुन्हा एकदा थिएटरमध्ये प्रदर्शित करण्याचा ट्रेंड सुरू झाला आहे. आता ३० वर्षांपूर्वीचा एक चित्रपट पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आमिर खान, उर्मिला मातोंडकर व जॅकी श्रॉफ यांचा 'रंगीला' हा चित्रपट बरोबर ३० वर्षांनंतर २८ नोव्हेंबर रोजी पुन्हा एकदा चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. प्रेक्षकांना हा चित्रपट 4K HD रिस्टोअर्ड व्हर्जनमध्ये पाहता येईल. 'रंगीला'च्या री-रिलीजच्या वृत्ताने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे.

तब्बल ३० वर्षांनी हा चित्रपट आताच्या पिढीला पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर पाहता येणार आहे. राम गोपाल वर्मा दिग्दर्शित 'रंगीला' हा चित्रपट पहिल्यांदा १९९५ मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाला ए.आर. रहमान यांनी संगीत दिले होते. सुंदर गाणी, भावनिक कथा यामुळे प्रेक्षकांना तेव्हा हा चित्रपट खूप भावला होता. दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांनी यासंदर्भात एक अधिकृत निवेदन जाहीर केले आहे.

रंगीला चित्रपटाने दाखवून दिले की सामान्य लोकही मोठी स्वप्ने पाहण्याचे धाडस करू शकतात. रुलब्रेकिंग सिनेमा हा सर्वात अविस्मरणीय असतो हेही या सिनेमाच्या यशातून दिसून येतं, असं वर्मांनी म्हटलंय. अल्ट्रा मीडियाचे सीईओ सुशीलकुमार अग्रवाल रंगीलाच्या री-रिलीजबद्दल म्हणाले, खूप लोकांसाठी 'रंगीला' हा बॉलीवूडच्या सुवर्णकाळातील एक आठवणींचा प्रवास आहे.

अल्ट्रा रिवाइंडसह, आम्ही हा लोकप्रिय क्लासिक सिनेमा आताच्या प्रेक्षकांसाठी 4K स्वरूपात आणत आहोत, जेणेकरून तो येत्या काही वर्षांपर्यंत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करत राहील. रंगीला चित्रपट १९९५ मध्ये सुपरहिट ठरला होता. रंगीलाचे बजेट ४.५ कोटी रुपये होतं. रंगीला चित्रपटाने ३० वर्षांपूर्वी बॉक्स ऑफिसवर ७१ लाख रुपयांची ओपनिंग केली होती.

पहिल्या आठवड्यात या चित्रपटाने २.०५ कोटी रुपये आणि पहिल्या आठवड्यात ३.७३ कोटी रुपयांची कमाई केली होती. रंगीलाने देशभरात एकूण २०.२२ कोटी रुपयांचे कलेक्शन केले होते. रंगीलाने बजेटच्या पाचपट कमाई केली होती. आता रंगीला पुन्हा एकदा प्रेक्षक मोठ्या पडद्यावर पाहू शकतील.

जुन्या पिढींसाठी हा अनुभव आठवणींना उजाळा देणारा ठरेल. तर नव्या पिढीला तरुणपणीचे आमिर खान, उर्मिला मातोंडकर व जॅकी श्रॉफसह इतर कलाकारांचा अभिनय मोठ्या पडद्यावर पाहायला मिळेल.



# तिच्याबरोबर काम करण्याची इच्छा नाही



राम गोपाल वर्मा बॉलीवूडमधील लोकप्रिय दिग्दर्शक आहेत. ते अनेकदा बॉलीवूड, हिंदी चित्रपट तसेच कलाकारांबद्दलची त्यांची प्रतिक्रिया व्यक्त करत असतात. अशातच त्यांनी बॉलीवूड अभिनेत्री जान्हवी कपूरबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. जान्हवी कपूरने २०१८ मध्ये आलेल्या 'धडक' चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. अलीकडेच ती 'परमसुंदरी'मध्ये झळकलेली. पण बऱ्याचदा आई-वडील मोठे कलाकार असले की, त्यांच्या मुलांची त्यांच्या कामाशी तुलना केली जाते आणि त्यामुळे अनेकदा कलाकार ट्रोलही होतात. जान्हवी कपूरला अनेकदा काही जण ती तिच्या आईसारखी दिसते, तसा अभिनय करते वगैरे म्हणतात; तर काही ती तिच्या आईसारखी दिसत नसून तिला अजून तिथे पोहोचण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागेल, असंही म्हणताना दिसतात. राम गोपाल वर्मा यांनीदेखील जान्हवी कपूरबद्दल अशीच काहीशी प्रतिक्रिया दिली आहे. वृत्तानुसार राम गोपाल वर्मा यांनी दिवंगत श्रीदेवीच्या कामाचं कौतुक केलं आहे. त्यांनी श्रीदेवीच्या काही चित्रपटांचंही कौतुक केलं आहे. यावेळी त्यांनी श्रीदेवी आणि जान्हवी कपूर यांच्यात होणाऱ्या तुलनेबद्दल मत व्यक्त केलं आहे. राम गोपाल वर्मा याबद्दल म्हणाले, जान्हवी कपूरमध्ये श्रीदेवी कुठेच दिसत नाही. ती श्रीदेवीसारखी नाही आणि माझी तिच्याबरोबर काम करण्याची काही इच्छाही नाही. अद्याप यावर जान्हवी कपूरने कुठलीही प्रतिक्रिया दिलेली नाही. ती अनेकदा मुलाखतींमध्ये तिच्या आईच्या सिनेमांचं कौतुक करीत असते. जान्हवीनंतर नुकतीच तिची बहीण व श्रीदेवी यांची धाकटी मुलगी खुशी कपूरनेही बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं आहे. तिने जोया अख्तरच्या 'द अर्चिज'मधून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. त्यानंतर ती करण जोहरच्या 'नादानियां'मध्ये झळकली. श्रीदेवी नवदच्या काळातील लोकप्रिय अभिनेत्री होती.

# परेश यांचा 'द ताज स्टोरी' वादाच्या भोवऱ्यात

ज्येष्ठ अभिनेते परेश रावल यांचा आगामी चित्रपट 'द ताज स्टोरी'मुळे आता बॉलिवूडमध्ये नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. ऐतिहासिक तथ्यांशी छेडछाड करून द्वेष पसरवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केल्याने या चित्रपटाला टीकेला सामोरं जावं लागत आहे. या सिनेमाविरोधात दिल्ली हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे.

'द ताज स्टोरी' हा चित्रपट ताजमहालच्या निर्मितीमागील इतिहासावर आधारित असल्याचा दावा केला जात आहे. चित्रपटात दाखवलेले काही प्रसंग आणि दावे हे अधिकृत ऐतिहासिक नोंदींशी जुळत नसल्याचा आक्षेप आहे. समीक्षकांचे म्हणणं आहे, की या चित्रपटाच्या माध्यमातून ताज महालचा इतिहास विकृत केला जात आहे. अनेक सोशल मीडिया युजर्स आणि काही गट असा दावा करत आहेत की, हा चित्रपट विशिष्ट समुदायाविरुद्ध द्वेष आणि नकारात्मकता पसरवत आहे. याशिवाय हा चित्रपट एकतर्फी कथा सादर करून धार्मिक भावना भडकावत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

परेश रावल यांनी अद्याप या आरोपांवर कोणतीही थेट प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, चित्रपट निर्मितीच्या सुरुवातीपासूनच हा विषय संवेदनशील असल्याने तो वादाच्या भोवऱ्यात सापडण्याची शक्यता वर्तवली जात होती. त्यामुळे हा चित्रपट रिलीज झाल्यावर कोणत्या दृष्टिकोनातून ताजमहालची कथा लोकांसमोर कशी येते, याकडे आता संपूर्ण देशाचं लक्ष लागलं आहे. या चित्रपटाची रिलीज डेट जवळ आल्यावर हा वाद आणखी वाढण्याची शक्यता आहे. दरम्यान या वादांवर चित्रपटाची टीम आणि कलाकार काय प्रतिक्रिया देतात, याकडे सर्वांचं लक्ष आहे.



# जन्नत फेम सोनल चौहानची मिर्झापूर सिनेमात एन्ट्री

जन्नत या चित्रपटातून प्रसिद्धी मिळवणारी अभिनेत्री सोनल चौहान हिट क्राईम ड्रामा मिर्झापूर: द फिल्म मध्ये सामील होत असल्याच्या अफवा गेल्या काही काळापासून पसरत आहेत. अखेर, अभिनेत्रीने अधिकृतपणे घोषणा केली आहे की तिला मिर्झापूर: द फिल्म च्या नवीन कलाकारांमध्ये सामील करण्यात आले आहे. अभिनेत्रीने इंस्टाग्रामवर एका पोस्टद्वारे ही बातमी शेअर केली. तिचा उत्साह व्यक्त करताना, तिने निर्मात्यांचे पत्र आणि तिच्या पोस्टमध्ये एक छोटीशी टीप समाविष्ट केली. सोनल चौहानने तिच्या पोस्टमध्ये लिहिले, ओम नमः शिवाय अशा अविश्वसनीय आणि गेम-चेंजिंग प्रवासाचा भाग असल्याचा मला खूप आनंद आहे. 'मिर्झापूर: द फिल्म' चा भाग होण्यास मी खूप उत्सुक आहे आणि माझ्यासाठी आमच्याकडे काय आहे हे पाहण्यासाठी मी तुम्हा सर्वांची वाट पाहू शकत नाही. 'मिर्झापूर' च्या जगात मला आणल्याबद्दल रितेश, फरहान अख्तर, गुरमीत सिंग आणि एक्सेल मूव्हीजचे आभार. तिच्या घोषणेसोबतच, तिने एक्सेल एंटरटेनमेंटच्या एका संदेशाचा फोटो देखील पोस्ट केला, ज्यामध्ये लिहिले होते, प्रिय सोनल, 'मिर्झापूर' च्या टीममध्ये तुम्हाला पाहून आम्हाला खूप आनंद झाला आहे. पडद्यावर तू निर्माण केलेली जादू पाहण्यासाठी मी उत्सुक आहे. हा चित्रपट गुरमीत सिंग यांनी दिग्दर्शित केला आहे आणि फरहान अख्तर आणि रितेश सिधवानी यांनी एक्सेल एंटरटेनमेंट अंतर्गत आणि ॲमेझॉन एमजीएम स्टुडिओजच्या सहकार्याने तयार केला आहे. पंकज त्रिपाठी, श्वेता त्रिपाठी, रसिका दुग्गल, अली फजल आणि दिव्येंदु शर्मा यांच्या पुनरागमनामुळे, हा चित्रपट मिर्झापूर कथेला मोठ्या पातळीवर घेऊन जाण्याचे आणि नवीन पात्रांची ओळख करून देण्याचे आश्वासन देतो. मिर्झापूर: द फिल्म' २०२६ मध्ये थिएटरमध्ये प्रदर्शित होईल. सोनलच्या समावेशामुळे या चित्रपटाभोवती उत्साह आणखी वाढला आहे. या चित्रपटात जितेंद्र कुमारसारखे नवीन चेहरे देखील आहेत, ज्यात रवी किशन आणि मोहित मलिक देखील प्रमुख भूमिकांमध्ये आहेत.